उंच माझा झोका... !

गोष्ट पुण्यातली. नुकतीच घडलेली. लहान मुलांच्या पालकांसाठी एक शिबीर सुरु होते. या शिबिरात आपल्या पाल्यासह अनेक पालक सहभागी झाले होते. आईवडील आणि मूल या तिघांसाठी एकाच वेळी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात आपल्या मुलाचे भवितव्य घडवण्यासाठी अनेक मातापिता लांब राहात असून सुद्धा आणि अनेक महत्वाची कामे बाजूला ठेवून  काढून हजर होते. या शिबिरात शिक्षकांनी मुलांच्या मातांशी एक संवाद साधण्यात आला. तुम्ही तुमच्या अयुष्यात समाधानी अहात का?  यावर बऱ्याच पालकांनी विशेषतः मुलांच्या मातांनी अनेक कारणे सांगितली. एक आई म्हणाली मला नोकरी आणि घरातील कामे यामुळे फारसा वेळ स्वत:ला मिळत नाही. दुसरी स्त्री म्हणाली की मला घरातील आजारी सासू सासरे आणि इतर कामे यामुळे मुलाकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. एका आईने आपल्या व्यवसायामुळे आपण मुलासाठी फारसा वेळ देऊ शकत नाही असे सांगितले. तिथे हजर असणाऱ्यांमध्ये एक चुणचुणीत तरुण आई बसली होती.ती तर एक सी ए होती. आणि विशेषतः मार्च महिना असताना आपल्या व्यस्त दिनचर्येतून वेळ काढून ती या शिबिरासाठी आली होती.  ती काही बोलली नाही हे पाहून  सरानी तिला विचारले की तुम्हाला काही सांगायचे नाही का ? यावर त्या तरुण स्त्रीने जे उत्तर दिले त्यामुळे सर्वच चकित झाले. ती म्हणाली की या सगळ्या समस्या माझ्यासाठी समस्या नाहीतच मुळी ! कारण माझ्यासाठी आयुष्य हेच मुळी एक challenge होत. त्यापुढे मला या सगळ्या अडचणी या अडचणीच वाटल्या नाहीत. जेव्हा जगणे हेच एक चैलेंज असेल. मी ज्या प्रसंगातून गेले आहे त्यापुढे या सगळ्या गोष्टी मला फार विशेष वाटत नाहीत. म्हणजे या सगळ्या समस्या जशा माझ्या इतर भगिनींना आहेत, तशा मलाही आहेतच. परंतु मी अशा एका प्रसंगातून बाहेर पडले आहे की त्यामुळे मला या गोष्टी किरकोळ वाटतात.आणि म्हणून मी हे सगळं आयुष्य नव्याने आणि पुरेपुर आस्वाद घेत जगते.

अशी कोणती समस्या त्या मुलीच्या जीवनात आली होती की ज्यामुळे तिला इतरांना जी गोष्ट खूप कठीण वाटते ती तिला वाटत नव्हती ? त्या मुलीच्या डोळ्यापुढून मागील काही वर्षात घडलेल्या घटनांचा पट डोळ्यापुढून सरकला. एक वर्षापूर्वी तिचे थोडेसे  पोट दुखायचे.  तिने सतर्क राहुन सोनोग्राफीचा निर्णय घेतला आणि त्यात तिला पोटात दोन गाठी असल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी शस्त्रक्रियेचा सल्ला दिला. तिला दवाख्यान्यात त्यासाठी दाखल केले गेले. आणि ऑपेरेशन टेबलवर सुरुवात करताना डॉक्टरांना वेगळाच संशय आला आणि त्यांनी ऑपेरेशन करणे थांबवले. आणि त्या गाठींचे नमुने पॅथॉलॉजिस्टकडे तपासण्यासाठी पाठवले. हे नमुने मुंबईच्या टाटा हॉस्पिटल मध्ये तपासणीसाठी पाठवण्यात आले. आणि डॉक्टरांची शंका खरी ठरली. त्या गाठी कॅन्सरच्या असल्याचे शिक्कामोर्तब झाले होते.

या घटनेने सगळे कुटुंबीय हादरून गेले होते. आणि ही गोष्ट त्या मुलीला कशी सांगावी असा प्रश्न सगळ्यांना पडला होता. खरे म्हणजे अशी गोष्ट सांगण्याची हिम्मत कोणाची होत नव्हती. टाटा हॉस्पिटलला आणखी काही चाचण्या केल्यानंतर त्या मुलीला तिसऱ्या स्टेजमध्ये असलेल्या दुर्मिळ अशा न्यूरोएंडोक्राईनचे निदान करण्यात आले. आणि तेथील डॉक्टरांनी ऑपेरेशनला पर्याय नाही असे सांगितले. हे ऑपेरेशन साधे नव्हते. केवळ ३२/३३ वर्षे वय असलेल्या त्या मुलीचे मातृत्व प्रदान करणारे सर्व अवयव काढून टाकावे लागणार होते. त्यात बरेच धोकेही होते. तसेच यापुढे ती कधीही आई होऊ शकणार नव्हती. हे सगळे ऐकल्यानंतर त्या मुलीच्या सासरचे

आणि माहेरचे सगळेच सुन्न झाले. या प्रसंगात सगळ्यांच्याच डोळ्यांत अश्रूंनी गर्दी केली. पण हे अश्रू तिच्यापुढे दाखवता येत नव्हते. आणि तिला हे सगळे कसे सांगायचे हा मोठा प्रश्न होता.

पण या सगळ्यात मोलाची भूमिका बजावली ती तिच्या मिस्टरांनी. त्यांनी तिला या वस्तुस्थितीची जाणीव करून दिली. आणि तिची मनोभूमिका तयार करण्यासाठी मोठा हातभार लावला. योग्य treatment साठी प्रयत्नशील राहिलेआणि सर्व परिस्थीतीत साथ दिली. तिला देखील काहीतरी विपरीत घडते आहे याची कल्पना आलेलीच होती. पण एकदम एवढी गंभीर गोष्ट असेल असे तिला वाटले नाही. तिला जेव्हा या सगळ्या विदारक सत्याची जाणीव झाली तेव्हा काही काळ ती सुद्धा सुन्न झाली. आणि ते साहजिकच होते. कोणीही तिच्या जागी असते तर हेच घडले असते. पण काही काळच ती अशा विमनस्क अवस्थेत राहिली पण तिचे उभे आयुष्य तिच्यापुढे होते. आणि केवळ चार वर्षांचा असलेला गोड चिमुरडा आपल्या आईकडे मोठ्या आशेने पाहात होता. आणि अशा परिस्थितीत तिने हिम्मत गोळा केली. स्वतःला सावरले. वस्तुस्थितीचा स्वीकार केला. आपल्याला हार मानून चालणार नाही. आपल्याला आपल्या मुलासाठी, आपल्या कुटुंबासाठी जगायचे आहे हा निर्धार तिने केला. प्रसंग आलाच आहे तर त्याला तोंड देणे क्रमप्राप्त आहे. ही जीवनमरणाची लढाई आपल्याला लढावीच लागेल याची जाणीव तिला झाली. पण ती लढाई हसतमुखाने लढण्याचा निश्चय तिने केला. खरे तर यापूर्वी सुद्धा तिच्या जीवनात अनेक कठीण आणि कसोटीचे प्रसंग आले होते. लहान असताना एकदा रस्ता ओलांडताना तिला एका मोटारसायकलने धडक दिली होती. त्या प्रसंगात तिचा पाय फ्रॅक्चर झाला होता. तेव्हा तिच्या पायाचे ऑपेरेशन करून एक रॉड पायात टाकावा लागला होता की आजतागायत कायम आहे. सी ए ची परीक्षा देण्यासाठी तिने प्रचंड तयारी केली होती. दिवसाचे १७/१८ तास अभ्यास करायची. यशाने दोन वेळा हुलकावणी दिली. सगळ्यांनी तिला सांगितले की ही परीक्षा पास होणे खूप कठीण आहे. दे सोडून. पण तिने हार मानली नाही. पुन्हा जिद्दीने परीक्षेला सामोरी गेली. आणि उत्तम प्रकारे चार्टर्ड अकौंटन्ट (CA ) झाली. हे करत असतानाच ती एम कॉम झालीआणि कंपनी सेक्रेटरी (CS )झाली. पण दैवाला जणू काही तिची परीक्षा अजून घ्यायची होती. ती किती सक्षम आहे हेच जणू ते बघत होते.

तिच्या जागी कोणीही असते तर अशा परिस्थितीत ती व्यक्ती कोलमडून पडली असती. पण ही सारिका मात्र खंबीरपणे उभी राहिली. या सगळ्या प्रसंगाला तोंड देताना तिच्या चेहऱ्यावर कोणतेही खिन्नतेचे किंवा दुःखाचे भाव नव्हते. नेहमीसारखेच प्रसन्न हास्य तिच्या चेहऱ्यावर विराजमान होते. गंमत म्हणजे जेव्हा तिला सेकण्ड ओपिनियन घेण्यासाठी वेगवेगळ्या डॉक्टरांकडे नेले तेव्हा डॉक्टर विचारायचे की पेशंट कोण आहे एवढ्या आनंदी चेहरयाने ती उपचार घ्यायची? शेवटी गेल्या ऑगस्ट महिन्यात ऑपेरेशन करण्याचे निश्चित झाले. या सगळी प्रसंगात सारिकाने आपले मन स्थिर ठेवले. एवढेच नाही तर या निमित्ताने वेळोवेळी टाटा हॉस्पिटलमध्ये जाणे, तेथील प्रचंड गर्दी, तऱ्हेतऱ्हेचे गंभीर रुग्ण, जाण्यायेण्याचा प्रवास, औषधे, इंजेक्शने आदी गोष्टी तिने अत्यंत धीराने आणि हिमतीने केल्या. सहा ऑगस्ट २०१८ ला तिचे ऑपेरेशन पार पडले. ऑपेरेशन तर यशस्वी झाले होते पण नंतरच्या सर्व मर्यादा, वेदना , औषधोपचार या सगळ्या गोष्टींना तोंड देणे सोपे नव्हते. पण या सगळ्यात तिचे कुटुंबीय आणि आई वडिल तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. आणि एका महिन्यानंतर सारिकाने हळूहळू आपल्या कामांना सुरुवात केली. यथावकाश ती तिच्या ऑफिसमध्ये जाऊन आपली कामे करू लागली. तशी तिची ट्रीटमेंट अजूनही सुरु आहे. नियमित तपासण्या सुरु आहेत. पण ती धीराने तोंड देते आहे. स्वतः कार चालवत ऑफिसला जाते आहे. नुकत्याच झालेल्या आपल्या धाकट्या दिराच्या लग्नात तिने उत्साहाने सहभाग देऊन आपल्यावरील जबाबदाऱ्या पार पाडल्या . आणि आता आपल्या मुलासाठीच्या शिबिरात आणि

त्याच्या भवितव्यासाठी ज्या ज्या काही गोष्टी कराव्या लागतील त्या सगळ्या ती करते आहे.ती म्हणते की आपल्या आयुष्यात आलेल्या संकटांचा स्वीकार करा आणि परमेश्वरा वर विश्वास ठेवुन त्यांचा सामना करा. संकटवर मात करण्यासाठी योग्य  पाऊले उचला.. यश मिळेल याची खात्री बाळगा. या सगळ्यात तिच्या सासुबाईंनी तिला खंबीर पाठिंबा दिला आणि treatment सुरु असताना मुलाची संपुर्ण जाबबदारी घेतली. नणन्द डॉक्टर असल्यामूळे तिने अगदी बहिणी सारखी मदत केली. सतत तिच्याबरोबर सावली सारखी राहिली.

या सगळ्यांच्या शुभेच्छा, परमेश्वरचरणी गाढ श्रद्धा आणि तिची दृढ  इच्छाशक्ती यांनी कितिहि कठिण परिस्थितीवर आपण मात करू शकतो अस तिला वाटत. आज ती आपले घर,सासूसासरे,कुटुंबीय,व्यवसाय आणि छंद आनंदाने सांभाळते आहे. इतरांना मार्गदर्शन करते आहे. आपल्याला आपण जोपर्यंत मोठी रेष  बघत नाही तोपर्यंत आपल्याला लहान रेष म्हणजे आपले प्रॉब्लम्स खुप मोठे वाटतात. म्हणून आपण अस काही कराव की सगळ्याना ते प्रेरणादायी ठराव... आकांक्षापुढती जेथे गगन ठेंगणे... ! अशा या माझ्या मुलीचा सारिकाचा मला अभिमान आहे.

- विश्वास देशपांडे, चाळीसगाव.